# प्रथा - काही उपआख्याने

**- चन्द्रशेखर पुरन्दरे**

*(प्रत्येक 'तो' वेगळा आहे.)*

- त्याचे वडील बँक मॅनेजर होते. नोकरी फिरतीची होती. दर काही वर्षांनी नवे ठिकाण. हे सततचे विस्थापन त्यांना झेपेना. असे न झेपणे हीही एक प्रथा झाली होती. ते सहन व्हावे म्हणून ते प्रथेनुसार नियमित दारू पिऊ लागले. दारू हा आधार कारण ती स्थैर्य देई. पुण्यात जी व्हिस्की मिळत असे तीच खांडव्याला, तीच नागपूरला. हा मोठा दिलासा होता. विस्थापन आणि नवऱ्याची दारू या बायकोच्या नियंत्रणाबाहेरच्या गोष्टी. त्यामुळे बायको प्रथेनुसार एका धार्मिक पंथाला लागली आणि यांचा दारूवरचा भरोसा वाढला. बायको वेळी-अवेळी, अवेळीच जास्त ध्यानधारणा करत असे, चार सहभक्त गोळा करून मोठ्याने भजने म्हणत पूजा-अर्चा करत असे, आरत्या म्हणत असे, इत्यादी. म्हणजे त्याच्यापुढे आई-वडिलांची भिन्न उदाहरणे होती. त्याला गाण्याचाही छंद होता. तो एका ऑर्केस्ट्रामध्ये कॉलेजपासून गायकही होता. रात्री-बेरात्री, बेरात्रीच जास्त त्यांचे कार्यक्रम चालत. त्यामुळे वडिलांचे उदाहरण अधिक योग्य मानून व प्रथेनुसार तोही इतर मंडळींच्या नादाने दारू पिऊ लागला. हे पिणे व्यसन या दर्जाला गेले.

दरम्यान त्याचा कॉलेजातील एक जवळचा मित्र राजकारणात गेला. यथावकाश तो राज्याचा ज्येष्ठ कॅबिनेट मंत्रीही झाला. दोघे एकमेकाच्या संपर्कात राहिले.

यथावकाश त्याला लग्नाची गरज भासू लागली. पण गाणे-बजावणे आणि नोकरी नाही या गोष्टी प्रथेनुसार नव्हत्या म्हणून लोकांना नामंजूर होत्या. त्यात तो दिसायलाही विचित्र होता. चेहऱ्यावरचे कातडे ताणलेले होते. त्यामुळे डोके कवटीसारखे दिसे. डोळेही खोल व निस्तेज. त्याबाबत इलाज नव्हता पण ऑर्केस्ट्रातून बाहेर पडणे कितीही मनाविरुद्ध असले तरी शक्य होते. म्हणून त्याने ऑर्केस्ट्रा सोडला. मद्यपानही थांबवले. त्याबरोबरच एक नोकरीही करू लागला. आता प्रथेनुसार आपण लायक वर झालो असा त्याचा ग्रह झाला. पस्तिशीच्या आसपास अखेर एका ग्रामीण भागातल्या मुलीशी त्याचा साखरपुडा झाला पण त्या मुलीला आपण आता परतीचे दोर कापून टाकले आहेत का अशी भीती वाटू लागली. तिने पूर्ण विचार करून पण लगेचच 'याच्याशी लग्न नको' असे आई-वडिलांना सांगितले. दरम्यान त्याचे गाणे-बाजवणे व मद्यपान ही कीर्तीही त्या लोकांपर्यंत पोचली होती. त्यामुळे तिचे आई-वडीलही अस्वस्थ होते. निर्णय तिने घेतला हे त्यांना बरेच झाले. त्यांनी मग जुन्या प्रथेनुसार बळजबरी न करता नव्या प्रथेनुसार तिचे ऐकले. साखरपुडा मोडला. हा परत बायकोच्या शोधात हिंडू लागला.

अखेर त्याला एक चिक्कार जाड घटस्फोटिता मिळाली. ती सवत्स धेनु नव्हती पण तिला मूल हवे होते. तेही, प्रथेप्रमाणे लग्नाच्या नवऱ्याकडून. ती एका उच्च लष्करी अधिकाऱ्याची मुलगी. ती पीएच. डी. होती व एका कॉलेजात लेक्चरर होती. माहेरी आचारी आणि पडेल (किंवा न पडेल) अशा कामांसाठीही नोकर, ड्रायव्हर होते. त्यामुळे तिला ना घरकाम जमत असे ना ड्रायव्हिंग. ती मराठीभाषिक नव्हती. त्यामुळे सासूला प्रथेनुसार ती फारशी पसंत नव्हती. पण यथावकाश अपत्यप्राप्ती झाल्यावर प्रथेनुसार सासूचा विरोध कमी झाला. मुलगा वर्षाचा व्हायच्या आतच त्यांनी चोवीस तास एक बाई त्याच्या प्रतिपाळासाठी ठेवली. ती तेथेच राहात असे.

नोकरीत तो टिकत नसे. मग त्याने अल्पावधीत खूप पैसे मिळवण्याचा सोपा मार्ग शोधला. त्याचा मित्र राज्यात कॅबिनेट मंत्री होताच. त्याचे नाव जरूर तेव्हा त्याच्या संमतीने वापरून व्यावसायिकांना लायसन्स मिळवून देणे, त्यांची मंत्रालयात अडकलेली कामे धक्क्याला लावणे असा उद्योग तो करू लागला व चांगला पैसा मिळवू लागला. 'तुझ्या पापात आम्ही सहभागी नाही पण कमाईत आम्ही हिस्सेदार' अशा प्रथेनुसार बायकोही खूश झाली. त्याच्या भडवेगिरीच्या कामासाठी त्याला आई-वडील राहात त्या नागपूरपेक्षा पुणे सोयीचे होते म्हणून तो त्या बाईसकट सहकुटुंब पुण्याला आला. सासुरवास अक्षरशः संपल्यामुळे बायको अधिकच खूश झाली. शिवाय वडिलांना हार्ट अटॅक येऊन गेला होता. त्यांच्या शुश्रुषेतूनही सुटका झाली.

त्यांना फार महागड्या नाही पण मध्यमवर्गाला झेपेल अशा हॉटेलात रोज दोनवेळा जाऊन जेवायला आवडे. कारण तिला स्वयंपाक येतही नसे व तो करणे आवडतही नसे. त्याला अधून मधून घरचे खायला आवडे. मग तो स्वतःच प्रयोग करत असे. त्याने केलेले पदार्थ फक्त तो खाई. म्हणजे तिच्यासाठी आणि मुलासाठी त्याला बाहेरून खाणे आणायलाच लागे. शक्य तेव्हा तो ओळखीच्या एखाद्याला बरोबर जेवायला बोलावे. त्या माणसाचा समज असा होई की बोलावले म्हणजे बिल हा भरणार. पण बिल यायच्या आतच तो, बायको आणि मूल सफाईने टेबल सोडून जात व बिल पाहुण्याच्या गळ्यात पडे. एकेकदा हा हिसका बसल्यावर असे पाहुणे येणे बंद झाले.

खरा प्रॉब्लेम आला जेव्हा पैशाच्या एका व्यवहारात त्याने गडबड केली. मंत्रालयात पेंडिंग एका केसवर काही गैरसोयीचे शेरे होते. ते रद्द करण्यासाठी मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी काही लाखांची मागणी केली. ती वाढवून त्याने त्या व्यावसायिकाकडे आणखी जास्तीची मागणी केली. त्याने मागितले ते पैसे व्यावसायिकाने त्याला दिले. याने मध्ये बरेच हडप केले आणि मंत्रालयात त्यांच्या मागणीपेक्षा कमी पैसे पोचवले. एक महागडी कार घेतली. मग मंत्रालयातील अधिकारी हटून बसले. प्रकरण अडकले. व्यावसायिक त्याच्या मागे लागला. याला लपायला जागा नव्हती. मग त्याने मंत्री-मित्राला फोन केला, एकदा, दोनदा, अनेकदा. पण मंत्रीमहाशय त्याचा फोन उचलेनात. त्याला हा मोठाच धक्का होता. आपला धनी गेला, या प्रॉब्लेमवर उपाय म्हणून प्रथेनुसार तो परत जोरदार दारू पिऊ लागला. बायको वैतागली; पण करते काय? हा झिंगून घरी पडलेला असे.

मग म्हाताऱ्या हार्ट पेशंट वडिलांनी अशा कामातील एक एजन्सी शोधली. त्या एजन्सीने तीन आडदांड गुंड याच्या घरी कारने पाठवले. त्यांनी बायको-मुलाला वेगळ्या खोलीत बंद केले आणि याला त्यांच्या कारमध्ये टाकले. मग खोली उघडली व त्यांना बाहेर येऊ दिले. 'याला नागपूरला घेऊन जात आहोत' असा त्रोटक खुलासा दिला. 'बाकी प्रश्न याच्या वडिलांना विचारा' असे सांगून कार सरळ नागपूरला वडिलांच्या घरी आणली. याला त्यांच्या हवाली सुपूर्द केले.

तिकडे बायकोने तिच्या दिल्लीतील भावाला हा प्रकार सांगितला आणि मुलाला घेऊन ती दिल्लीला रवाना झाली. त्याचा पुण्यातील एक चुलत भाऊ सौजन्याने त्यांना पुण्याच्या विमानतळावर सोडायला आला.

काही काळाने हा परत ठीक झाला कारण मंत्र्याने प्रकरण मिटवून टाकले. दोघांना सोयीचे असल्याने त्यांचे संबंधही पूर्ववत झाले. हा परत पुण्याला आला. प्रथेनुसार त्याने बायकोची क्षमा मागितली व दारू सोडल्याची ग्वाही दिली. बायको-मुलगा पुण्याला याच्याकडे परत आले. नव्या गाडीतून हिंडू लागले.

असा त्यांचा संसार पुन्हा सुखाचा, ते अमृतात नहाले.

- तो एका चांगल्या शाळेत शिकला. नंतर कॉलेजही केले. त्याचे वडील एका आंतरराष्ट्रीय लायब्ररीचे पुण्यातील व नंतर मुंबईतील प्रमुख होते. हे मानाचे पद होते त्यामुळे परावर्तित प्रकाशात तोही उजळून निघत असे. यथावकाश तो चांगल्या पगाराच्या नोकरीला लागला. व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर शो रूममधून कंपनीचा माल विकणे हे काम असे. तो दिसायला बरा होता, गोरा होता व पाच फूट अकरा इंच उंच होता. म्हणजे भारतीय मापदंडाने उंचात जमा. त्यामुळे आपण अतिशय देखणे आहोत, रुबाबदार आहोत असा

त्याचा प्रथेनुसार समज होता. स्वतःचे कपडे, बूट-मोजे, गंजिफ्रॉक, अंडरवेअर, आफ्टरशेव, गॉगल यांच्याबाबत तो अतिशय हौशी होता. म्हणजे, त्याला कपडे संख्येने हवे असत, टिकाऊ किंवा दर्जा चांगला म्हणून नव्हे. पुण्या-मुंबईतील विशिष्ट दुकानांतच तो कपड्यांची खरेदी करे. तेही दर दोन-तीन महिन्यांनी, जरूरी नसतानाही. उदाहरणार्थ, पुण्यात असताना जर कोणी ओळखीचा मुंबईला जाणार असेल तर तो कुलाब्यातील त्याच्या विशिष्ट दुकानाचा पत्ता देई. त्या माणसाला तिथले त्याच्या साइझचे सगळे शर्ट खरेदी करायला सांगे. तो माणूस जे शर्ट विकत घेईल, ते सगळेच त्याला पसंत असतील किंवा नसतील, तो ते आवडीने वापरत असे कारण ते त्या दुकानातून आलेले असत. त्यात तो उडदामाजी करत नसे. यावरून त्याच्या वृत्तीचा अंदाज यावा. असा (अक्षरशः) पोशाखी उथळपणा अनेक भारतीय नवश्रीमंतांच्यात आढळतो, तारुण्य, रूप, संपत्ती यातील एक गोष्ट जरी एखाद्याकडे असली तरी माणसाला उन्माद येऊ शकतो असे एक संस्कृत वचन आहे. त्याच्याकडे तर त्याच्या मते तिन्ही गोष्टी होत्या! (नेमक्या याच दृष्टिकोनावर अलीकडच्या बातमीनुसार चिनी सरकारने पैशाची अतोनात उधळमाधळ करायला प्रवृत्त करणाऱ्या सोशल मीडिया पोस्ट्सवर/टीव्हीवरच्या मालिकांवर बंदी घातली आहे.)

दरम्यान प्रथेनुससार त्याने लग्न केले. बायको त्याला तेव्हा स्मार्ट वाटली.

प्रथेनुसार तो रोज भरपूर दारू पीत असे व चिकार सिगरेटी फुंकत असे. त्याच्या मते तो त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग होता. प्रथेनुसार त्यांना एक मुलगी झाली. प्रथेनुसार ते तिला लाडाने वाढवत असत. त्याची आईही त्या उपक्रमात प्रथेनुसार सक्रिय होती.

जरा प्रॉब्लेम झाला तो त्याच्या वडिलांच्या विकाराच्या निदानाने व नंतर निधनाने. ते कॅन्सरने बराच काळ आजारी होते. त्या दुखण्याने तो प्रथेनुसार जरा खचला. तरीही ते गेल्यावर हा नैसर्गिक क्रम होता असे त्याने मानले. जरा कमी झालेली दारू, सिगरेटी, खरेदी परत उमेदीने सुरू केली.

बायको पहिल्यापासूनच राजकारणात सक्रिय होती. राजकारण हा पैसे मिळवण्याचा मार्ग ही जगभरच्या राजकारण्यांची प्रथा. तो मार्ग आपल्यालाही सापडला असे तिला वाटले. पैसा तर बेकायदेशीर मिळवायचा पण त्यात अडकायला नको एवढे संभाळायचे. प्रथेनुसार तिने अशा व्यवहारातील एक पित्तू गाठला, किंवा त्याने तिला गाठले. दोघांनी मिळून भारतीय राजकारणी प्रथेनुसार जमिनीच्या खरेदीविक्रीचे व्यवहार सुरू केले. एकाकडून जमीन कवडीमोलाला विकत घ्यायची आणि दुसऱ्याला ती चढ्या भावाने विकायची हा व्यवहार. असे सहा-सात व्यवहार झाले, पैसा मिळाला व तिला आत्मविश्वास आला. बायकोबद्दल त्याचाही आदर वाढला.

आता खेड-शिवापूरजवळ एक धाबा काढायचा असा विचार त्याने सुरू केला व जमिनीची पाहाणी केली. हायवेला लागून एक प्लॉटही निश्चित केला. उद्या आपल्या या धाब्यावर आपण भेटीसाठी आलो की मॅनेजर आपल्यापुढे कसा अदबीने झुकेल; सर, सर म्हणेल, अशा स्वप्नरंजनाने तो खूश होत असे.

म्हणजे, तोपर्यंत त्यांचा संसार हा सुखाचा, ते अमृतात नहाले!

सरकारी कागदपत्रे हाताळण्यासाठी त्यांनी एक-दोन मध्यस्थ नेमले होते. गोची अशी झाली की मिळालेले सगळे पैसे त्यांनी उधळले. एका मध्यस्थाचे कमिशनचे व इतर खर्चाचे पैसे आज-उद्या देतो अशी चालढकल सुरू केली. बायकोसाठी पित्तूने चार मंगळसूत्रे, सहा चांदीचे कंगवे, बारा सोन्याच्या बांगड्या, चार तोडे, आठ पैंजण, सोन्याची व चांदीची एकेक मोहनमाळ व कंबरपट्टा, सोन्याचा व चांदीचा लफ्फा, सोन्याची व चांदीची पाचू व पोवळे असणाऱ्या बिंदी, मोत्याचा आणि सोन्याचा गोफ, तेरा रत्नजडित अंगठ्या, प्लॅटिनमची कर्णफुले व कुड्या, चांदीची, मोत्याची आणि सोन्याची नथ आणि एक हिरेजडित मुकुट घ्यायला पैसे खर्च केले होते. याच्या बायकोने त्याच्या आग्रहानुसार नवीन मोठा फ्लॅट विकत घेण्यासाठी बुकिंगमध्ये गुंतवले होते. मध्यस्थाला द्यायला त्यांच्याकडे पैसेच नव्हते. 'जरा थांब' असे त्यांनी परत परत सांगून बघितले पण तो ऐकेना. त्याने स्वखर्चाने सरकारी अधिकाऱ्यांना बरेच पैसे वाटले होते. हे प्रकरण

ताणत  गेले. इतके, की शेवटी त्या माणसाने या दोघांची नावे लेखी नमूद करून आत्महत्या केली.

मग प्रथेनुसार पोलीस चौकशी, कोर्टात खटला झाला. दोषी ठरून प्रथेनुसार तिला व भागीदाराला दीड वर्षाचा तुरुंगवास झाला.

मध्यंतरी सुबत्तेच्या काळात त्यांनी मुलीचे लग्न सुस्थळी केले होते. बायको तुरुंगातून बाहेर येईपर्यंत त्याची आर्थिक परिस्थिती खालावलेली होती. आयुष्यभरच्या बिड्याही बोलू लागल्या होत्या, त्यामुळे डॉक्टरांचा खर्च. हळूहळू श्रीशिल्लक संपली आणि नोकरीही संपलेली. आता लग्न झालेली मुलगी प्रथेनुसार रोजचा जेवणाचा डबा पाठवते. दारू, सिगरेट्स, ऐषारामी खरेद्या बंद नाही तरी जवळजवळ शून्यावर आल्या. असा त्यांचा संसार चालू राहिला. तो ना सुखाचा ना ते अमृतात नाहाले. अशी मजा!

- ते तिघे भाऊ. वडिलांना दारूचे व्यसन होते. ऑफिसातून घरी आले की ते प्रथम बाटली उघडायचे. तिघेही तेव्हा शाळेत होते. यांच्या या सवयीने ते चक्रावून जात. विशेषतः थोरल्याच्या मनावर अनिष्ट परिणाम होऊ लागला. त्याचे शिक्षणात लक्ष होते पण तो वर्गातल्या मुलांबरोबर मिसळत नसे. अबोल आणि एकटा रहाणे पसंत करे. त्यातल्या त्यात त्याला जवळचा एकच मित्र होता. तोही याच्यासारखा जैन. त्यांच्या मनात बहुसंख्य हिंदू विद्यार्थ्यांबद्दल जरा आकस असावा. हे लोक आपल्याला बरोबरचे समजत नाहीत असा  ग्रह असावा. वस्तुतः त्यांच्या नावा-आडनावावरून ते अहिंदू असावेत असे वाटत नसे. कदाचित त्या वयात जात-धर्म या ओळखी उत्तरायुष्यात होतात तितक्या तीव्र नसाव्यात.

पण घरी व्यसनाधीन वडील व आपण अल्पसंख्य ही भावना याचा परिणाम त्याच्या घडणीत झाला. तो शाळेत हुशार विद्यार्थी नव्हता पण ढही नव्हता. वरचे दहाजण आणि खालचे दहाजण यांच्यामधील बहुसंख्य  तीस-चाळीस जणांत होता.

वडिलांच्या रोजच्या सपासप पिण्याने रिकाम्या बाटल्या घरात जमायच्या. दर काही दिवसांनी हा त्या गोळा करत असे. एका जुन्या पिशवीत त्या भरून शाळेआधी जवळच्या नदीत त्या विसर्जन करे. ही लाजिरवाणी बाब जितकी गुप्त राहील तेवढी गुप्त ठेवण्याचा प्रयत्न करे.  त्यामुळे सायकलवरून पिशवी घेऊन जातानाही तो कोणी पाहील का या दडपणात असे. पिशवी पुलावरून नदीत टाकणे तर आणखीच तणावपूर्वक असे. चारी बाजूला पाही, कोणी आपल्याकडे संशयाने तर पाहात नाही ना, पिशवी पाण्यात बुडेपर्यंत टेन्शन, इत्यादी.  हा क्रम बरीच वर्षे चालला.

अखेरीस एक वेळ अशी आली की अतिरिक्त मद्यपानाने वडील आजारी पडले. त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले. योगायोग असा की त्या डॉक्टरांचा मुलगा याच्याच शाळेत याच्याच वर्गात होता. याच्या सुदैवाने त्याच्यापर्यंत हे आजारपण पोचले नाही. डॉक्टरांनी 'आणखी प्याल तर मराल' असे स्पष्ट शब्दांत वडिलांना सांगितले. मग त्यांची दारू सुटली.

त्यांची मिळकत चांगली होती. तिन्ही मुलांसाठी त्यांनी फ्लॅट्स घेतले. मात्र फ्लॅट्स मुलांच्या नावे न करता त्यांच्या बायकांच्या नावे केले. म्हणजे मुलगे लग्न शाबूत ठेवतील अशी त्यांना आशा होती.

वडिलांचे मद्यपान संपल्यावर हा अभ्यासात जरा लक्ष केंद्रित करू शकला.

तरी या अनेक वर्षांच्या तणावाचा दीर्घकालीन परिणाम झालाच. काहीही करू नये अशी मानसिक अवस्था वारंवार येऊ लागली. त्याला chronic fatigue syndrome म्हणतात. त्यावर औषध नसते. भले इतर त्याला आळशी म्हणोत, तो या विकाराने खरोखर ग्रस्त होता, मनाचे खेळ नव्हते. तो तासन् तास  सुन्न बसून असे. करायचे सगळे काम दिसत असताना त्याला उठवतच नसे. त्यामुळे सी. ए. ची परीक्षा त्याला पाच वेळा द्यायला लागली. तेव्हा कोठे तो पास झाला. लग्न यथावकाश प्रथेनुसार झाले; पण मूल झाले नाही. तो नवीन दुर्घटक. सीए म्हणून काम त्याने मर्यादित ठेवले. आपल्याला एकट्याला झेपेल एवढेच काम तो स्वीकारे व घरून काम करे. मदतीला कोणीही नाही. शाळेतले काही मित्र त्याला काम देत असत.  पण यांच्यापैकी कोणाचा फोन आला तर बऱ्याच वेळा काम टाळण्यासाठी तो त्या माणसाला 'मी वेबिनारमध्ये आहे'

असे सांगे व परत फोन करत नसे. हा त्या fatigue syndrome चा भाग होता.

तसेच काही कंपन्यांचे काम तो करे. त्यांचे अकाउंटिंगचे काम असेच पण जास्तीचेही काही असे. इन्कमटॅक्सच्या लोकांना पैसे हवे असत. ते याच्यामार्फत दिले जात. कारण कंपनीचे लोक व इन्कमटॅक्सचे कर्मचारी दोघांचाही याच्यावर विश्वास होता.

मूल नसल्याचा एक परिणाम म्हणजे प्रथेनुसार तो बायकोच्या रक्षणाबाबत अतिशय संवेदनशील होता. एकदा त्याचा शाळेतील मित्र कामाच्या संदर्भात काही कागदपत्रे द्यायला त्याच्या घरी आला. कागदपत्रे याच्या घराच्या जवळ असणाऱ्या बँकेतून मिळाली होती म्हणून सहज तो त्याच्या घरी गेला. हा तेव्हा घरी नव्हता. त्याने बायकोला ती कागदपत्रे दिली. त्याला आपण नसताना मित्र घरी येऊन गेल्याचे कळताच तो बिथरला. मित्राला त्याने 'तू इथे असा येत जाऊ नकोस' असे खडसावले. मित्र गोंधळलाच! याच मित्राचे PAN कार्ड गहाळ झाले होते. त्याने जंग जंग पछाडले, घरी नाही मग याला विचारले. पण कार्ड सापडले नाही. नंतर काही वर्षांनी मित्राची फाइल याने परत केली तेव्हा त्याला ते कार्ड फाइलमध्ये सापडले!

आपण जैन आहोत ही ओळखही प्रौढावस्थेत बळकट होऊ लागली. त्यामुळे शाळेतल्या त्या जैन मित्राबरोबर त्याची दोस्ती पुढेही राहिली. त्याच्या वर्गातला आणखी एक जण लिंगायत होता. काही लिंगायत स्वतःला हिंदू समजत नाहीत, त्यातला तो एक. शाळेत असताना हे दोघे काही फारसे जवळचे नव्हते. पण पुढे त्याने त्याचे अकाउंटिंगचे काम याला दिले. तो तोपर्यंत एक तज्ज्ञ डॉक्टर म्हणून बऱ्यापैकी प्रसिद्ध झाला होता. त्यामुळे याला त्याच्याबद्दल अभिमान होता. त्याने आपल्याला काम दिले हा आपला सन्मान झाला असे त्याला वाटत असे. पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणासाठी लिंगायताने 'मागासलेला' या आरक्षणात जागा मिळवली होती. पण 'त्याने तर राखीव जागा मिळवली' असा उल्लेख जेव्हा कोणी करत असे, तेव्हा हा संतापाने 'अरे पण तो पुढे शिकला ना' असे त्याच्या समर्थनार्थ ठासून म्हणे!

बालपणीचे दुःखद अनुभव, निःसंतान अवस्था आणि अल्पसंख्यांचा गंड यांची अशी मजा!

- त्याचे वडील पुण्यातील एक कॉलेजात प्रोफेसर होते तर आई शाळेत शिक्षिका. वडील मवाळ स्वभावाचे होते. आई शाळेतल्या व स्वतःच्या मुलांबाबत कडक होती. ते दोघे भाऊ. आईचे वडील प्रख्यात ज्योतिषी होते. ते गेल्याची बातमी रेडिओवर आली होती, तसेच त्यांना आपले मरण केव्हा हे तारीख आणि अचूक वेळ यानुसार बऱ्याच आधी माहीत होते असे सांगितले जाते. तिला माहेरचे फार कौतुक. तसेच अत्यंत कर्मठ परंपरेचेही कौतुक. त्यामुळे वर्षभराचे सणवार, साप्ताहिक उपवास, व्रतवैकल्ये नियमितपणे घरी होत. कर्मठ माणसे जशी इतरांबाबत कठोर, प्रसंगी क्रूर असतात, तशीच तीही होती. धाकटा मुलगा तिच्या जास्त धाकात राहिला, तोही त्याच्या आयुष्यभर.

या धाकाचा एक परिणाम म्हणजे त्याला स्वतःची निर्णयक्षमता नव्हती. 'आई काय म्हणेल, तिला काय वाटेल' ही टांगती तलवार कायम त्याच्या डोक्यावर असे. म्हणजे, काही कृती केल्यास तिला पसंत पडेल का नाही हा संभ्रम असे आणि बहुतेक पसंत पडणार नाही अशी भीती असे. परिणामतः त्याला आत्मविश्वास राहिला नाही. जेवायला बसल्यावर आपल्याला दोन पोळ्या लागतील का तीन, तेही आताच ठरवायचे का; कोशिंबीर दोन चमचे घ्यावी का चार अशा त्याच्या यातना असत. थोडक्यात तो कायम दडपणात असे. एखाद्याला बाहेर भेटायचे झाले, तेही पंचविशीत, तर भेटावे का न भेटावे हे ठरवणे कठीण काम होई.

पण वर म्हटल्याप्रमाणे कर्मठ असल्याने तो प्रसंगी क्रूरही होत असे. उदाहरणार्थ, त्याच्या एका जवळच्या मित्राला रोज दारू प्यायला आवडे. दोघे जण संध्याकाळी दहा-बारा किलोमीटर चालायला जात असत. हे रूटीन झाले होते व बरीच वर्षे चालले. ते पाच-सहा किलोमीटर चालल्यावर एका बारमध्ये बसत असत. मित्र बीयर पीत असे व हा एखादे कोल्ड ड्रिंक कारण तो दारूला हात लावत नसे, तसेच सक्त शाकाहारी. वस्तुतः दारू न पिणाऱ्याबरोबर ती पिणाऱ्याने दारू घेत बसणे हा जरा तापदायक भाग असतो. पिणारा आणि न पिणारा यांच्या

मानसिक अवस्थेत अंतर वाढू लागते. तरीही ते मैत्रीखातर एकमेकांना सहन करत. पण एके दिवशी संध्याकाळी त्याने मित्राला कटवण्यासाठी एक सबब सांगितली. ती पारदर्शक खोटी होती. तेव्हापासून त्यांचे फिरणे थांबले; पण मैत्रीत खंड पडला नाही.

आई गेल्यानंतर अनेक वर्षांनी त्याच्या ओळखीच्या एकाला त्याचा एक रिकामा फ्लॅट काही दिवसांसाठी हवा होता. तेथे दारू आणि मांस-मटण चालणार नाही असे त्याने मित्राला स्पष्ट केले होते. तेही आईचे नाव घेऊन. ही अट पाळण्यापेक्षा ओळखीच्याने दुसरा फ्लॅट निवडला! मद्य न पिणाऱ्या व सक्त शाकाहारी लोकांना असतो तो नैतिक अहंकार मित्राला खटकला.

आईच्या धाकाचा दुसरा परिणाम म्हणजे तो धर्माकडे वळू लागला होता. प्रथेनुसार आपण धर्मिक मार्गावर आहोत म्हणजे आपली आध्यात्मिक प्रगतीही होत आहे असा विश्वास त्याला प्राप्त झाला. वस्तुतः अध्यात्माचा जन्म प्रस्थापित धर्माला विरोध म्हणून झाला होता! पण प्रथेप्रमाणे अनेक जण करतात तशी तो दोन्हींची गल्लत करत असे, त्याच्या धार्मिक अभ्यासातही चिंतनापेक्षा पोथीनिष्ठतेवर भर असे. अशा लोकांचा असतो तसा पक्का मुस्लीमद्वेष, सनातनी हिंदू धर्म म्हणजे नक्की काय हे माहिती नसताना त्याचा दुरभिमान, बुद्ध व गांधी हे या देशाला लागलेले शाप आहेत असे ठाम मत, उर्वरित जगात अश्रद्ध भरले आहेत आणि ते बांगलादेशापसून वेनेझुएलापर्यंत गोंधळ घालत आहेत, ते दखलपात्र नाहीत; इत्यादी.

त्याबरोबरच त्याचा आजोबांकडून आलेला ज्योतिषावरचा विश्वास वयोमानानुसार अधिकाधिक दृढ होऊ लागला. दाभोळकर मंडळी त्या श्रद्धेला अंधश्रद्धा का म्हणेनात. तो बराच वेळ या अभ्यासात व्यतीत करे.

त्याचा थोरला भाऊ इंजीनियर झाला आणि चांगल्या नोकरीला लागला. मग त्याच्या लग्नासाठी शोधाशोध सुरू झाली. त्याला एक मुलगी आवडली. ती गोरी होती, कमी शिकलेली होती. फक्त शालांत परीक्षा पास झाली होती. त्यामुळे त्याच्या आई-वडिलांची जरा नाराजी होती पण त्यांनी मुलाच्या निवडीला आक्षेप घेतला नाही. त्यांचे लग्न झाले. ते त्याच्या आई-वडिलांबरोबर राहू लागले. राहाण्याची जागा फारच लहान होती. एक बेडरूम आणि एक खोली. किचन चिमुकले. त्यामुळे नवविवाहित जोडपे हनिमूनला चार दिवस शहरातच हॉटेलात राहिले. मग तीनचार पडदे लावून घरात आडोसा तयार करण्यात आला.

यथावकाश प्रथेनुसार इंजीनियरने बँकेचे कर्ज घेतले व स्वतःसाठी फ्लॅट घेतला. यथावकाश त्याला दोन मुलगे झाले. तेही दिसायला त्यांचे वडील व काकांसारखे गोंडस होते. इथपर्यंत त्यांचा संसार हा सुखाचा, ते अमृतात नहाले.

पण तो भाऊ वारंवार आजारी पडू लागला. आजारपण साधे नव्हते. काही काळाने त्याला कॉटवरून उठताही येत नसे. आजाराचे निदानही होईना. चढत्या श्रेणीने उत्तमोत्तम डॉक्टरांचा त्यांनी सल्ला घेतला. पण हा काय विकार आहे तेच त्यांना कळेना. थोडक्यात डॉक्टरांनी त्याला पेशंट म्हणून सोडून दिला. म्हणजे घरच्यांच्या अंगावर हा रुग्ण पडला. आई-वडील, बायको, धाकटा भाऊ यांनी प्रत्येकाला शक्य तेवढी काळजी घेतली. तो दिवसेंदिवस क्षीण होत गेला तरी झिजत झिजत खरोखर मरायला त्याने दहा वर्षे घेतली. तोपर्यंत वजन निम्म्याहून कमी झाले होते. नोकरी आधीच गेली होती, पण कंपनी चांगली असल्याने थोडेफार पैसे आजारपणात मिळत गेले. तरी घरखर्च भागवण्यासाठी निवृत्त आई-वडील जीवंत होते तोपर्यंत ते व साध्या नोकरीवरचा भाऊ यांच्यावरच जबाबदारी आली. त्यामुळे धाकटा भाऊ आणखीच धर्माकडे वळला.

यथावकाश धाकट्याचे लग्न झाले. त्याची बायको एका राष्ट्रीय बँकेत नोकरीला होती. म्हणजे कायमची नोकरी. धाकट्याने काही काळ नोकरी करून मग स्वतःचा धंदा सुरू केला. तो व्यवस्थित चालत होता. प्रथेनुसार आता त्यांना मूल हवे होते. एकदा तर बायकोची पाळी चक्क चुकली आणि ते अतिशय आनंदले पण तिला गर्भ राहिलेला नव्हता व आयुष्यभर त्यांना मूल झाले नाही. त्या प्रथानिष्ठ जोडप्याला हा कायमचा मोठाच धक्का होता. त्यामुळे तो मुले असणाऱ्या मित्रांच्या भेटी टाळू लागला. बायकोही सणासुदीच्या कौटुंबिक कार्यक्रमांना जाईनाशी झाली. तिच्या मनावर मूल न झाल्याने पन्नाशीनंतर प्रथेनुसार अनिष्ट परिणाम होऊ लागले. मग हा आणखीच त्वेषाने

धार्मिक मार्गाला लागला. प्रथेनुसार त्यात व ज्योतिषात उत्तरे शोधू लागला. भारतभर त्यांनी मुहूर्त, सोवळे-ओवळे संभाळत तीर्थयात्रा केल्या. असा त्यांचा संसार ना सुखाचा ना अमृतात नहाला.

थोरल्याच्या विधवेने यथावकाश प्रथेप्रमाणे एक विधुराशी लग्न केले. त्यांचा संसार सुखाचा आणि अमृतात नहाला.

- तो जुन्या काळच्या पुण्यातील एका प्रसिद्ध व ज्येष्ठ वकिलांचा मुलगा. ते धनाढ्य होते. त्या वेळचे भारताचे सरन्यायाधीश त्यांचे अगदी जवळचे मित्र होते. एखाद्या खटल्यासाठी त्यांना दिल्लीला जायला लागले तर त्यांचा मुक्काम सरन्यायाधीशांच्या अधिकृत बंगल्यात असे. ते घरातील ऑफिसात लोडाला टेकून जमिनीवर गालिच्यावर बसत. समोर लिहिण्यासाठी एक उतरते बैठे डेस्क असे. ते सतत तंबाखूचे पान चघळत. थुंकण्यासाठी सारखे उठायला नको म्हणून एक मोठी नक्षीदार पितळेची पिकदाणी जवळ असे. प्रथेनुसार मुलानेही वकील व्हावे अशी वडिलांची इच्छा होती. पण त्यांनी त्याला जवळच्या सुमार दर्जाच्या शाळेत घातले व तिथपासून त्यांच्या स्वप्नभंगाला सुरुवात झाली. त्याचे शिक्षणात लक्ष नव्हते. तो जेमतेम शालेय शिक्षण पूर्ण करू शकला इतकेच. वडिलांनीही हार मानली, मग फुटकळ धंदे करत त्याने इलेक्ट्रिशियनचा कोर्स केला आणि तो घरगुती वायरिंगची कामे करू लागला. ते शहराच्या जुन्या भागात राहात त्यामुळे दरघरी वायरिंग दुरुस्तीचे काम असे. लवकरच त्याला बऱ्यापैकी कमाई होऊ लागली. प्रथेनुसार आता त्याच्या लग्नासाठी आई-वडिलांनी योग्य मुलीचा शोध चालू केला. जवळच्या खेड्यातून शहरातल्या भावाकडे राहायला आलेली एक मुलगी गोरीगोमटी असल्याने प्रथेनुसार ती सर्वांनाच पसंत पडली.

बायको तर मिळाली आता प्रथेनुसार मुलगा हवा ही प्राधान्याची गोष्ट झाली.

यथावकाश बायकोला गर्भ राहिला व त्यांची उत्सुकता दिवसागणिक वाढू लागली. पण मुलगी जन्माला आली आणि प्रथेनुसार सगळे उदास झाले. पण दंतकथेतील वेताळाप्रमाणे त्याने हट्ट सोडला नाही व प्रयत्न चालू ठेवले. डॉक्टरांवर त्याचा विश्वास नव्हता हे एक. दुसरे अशा प्रॉब्लेमसाठी बायकोला बरोबर घेऊन डॉक्टरांचा सल्ला घ्यायला तो धजावत नव्हता. तिसरे, त्या काळी IVFसारखे उपचार उपलब्धही नव्हते. मग वैद्यांचे, वैदूंचे, मांत्रिकांचे सल्ले, जडीबुटी, काढे, चूर्णे, चघळायच्या गोळ्या, गिळायच्या गोळ्या, चाटणे, वाफारे, भस्मे, लेप, नामस्मरण, जपजाप्य, नवस, व्रतवैकल्ये, विशिष्ट मुहूर्तावर विशिष्ट पूजाअर्चना, शेक, विशिष्ट तेलमालिश, धूप-अंगारे, धुऱ्या सगळे करून झाले. बरी गोष्ट म्हणजे धंदा बरा चालला होता त्यामुळे पैशाची कमतरता नव्हती. हवा होता तो प्रथेप्रमाणे एक मुलगा. दुसरी बरी गोष्ट म्हणजे, 'मुलगा नाही' म्हणून प्रथेप्रमाणे बायकोची होऊ शकलेली हेळसांड तरी झाली नाही किंवा तिला त्या एकत्र कुटुंबाने त्रास दिला नाही. ज्या काही यातना, त्या त्या दोघांच्या. जोडप्याचा आशावाद स्तुत्य व चिकाटीही स्तुत्य. पुढे तिला ओळीने आणखी चार मुली झाल्या. अखेर तिची सुटका म्हणजे, शेवटच्या प्रसूतीत जुळे झाले. त्यात एक मुलगा व एक मुलगी होती.

दरम्यान सगळ्यात थोरली मुलगी एका साध्या विकाराने वयाच्या पाचव्या वर्षीच मरण पावली. तिच्या आईच्या मानसिक आरोग्यावर परिणाम तेव्हापासून सुरू झाला. मुलगा हवाच हे दडपण, एकामागून एक मुली, तितकी बाळंतपणे यामुळे तिचे मानसिक संतुलन बिघडू लागले. प्रथेप्रमाणे त्याकडे कुटुंबीयांनी दुर्लक्ष केले.

स्वभावाने अतिशय गरीब, दुसऱ्याचे कायम ऐकणारी बाई. त्यात तिच्या सासऱ्यांच्या निधनानंतर तिचा वडीलधारा आधार गेला. एक वेळ तर अशी आली की अंगावरच्या कपड्यांनिशी संसार सोडून ती भावाकडे जाण्यासाठी निघाली. भाऊ व वहिनी शहराच्या जवळच्याच दुसऱ्या गावी रहात असत. त्यांचा मुलगा शहरात राहात असे. ती त्याच्या घरी आली. तिला भाच्याकडे सोडायला तिचा नवरा आला. तेथे स्वयंपाकाची बाईही होती. परक्या माणसासमोर खाजगी गोष्टी बोलू नयेत याचे भान नवऱ्याला राहिले

नाही. संतापाच्या भरात त्याने तिला ती बेजबाबदार आहे, तिला मुलाबाळांची पर्वा नाही असे प्रथेनुसार ऐकवले व इतरही बरेच वाक्ताडन केले. पण तिला हे काहीही ऐकूच येत नव्हते. ती फक्त मान खाली घालून स्तब्ध बसून होती. मग भाचा तिच्या भावाच्या गावी बसने तिला घेऊन गेला. ती काही काळ भावाकडे राहिली. तिचा आत्मविश्वास पूर्ण गेलेला होता. तिच्या वहिनीने तिला सावरले आणि काही काळानंतर ती तिच्या घरी परत गेली.

परत एकत्र कुटुंबाकडे वळता, त्याला तीन धाकटे भाऊ. दुसरा व तिसरा फारसे शिकले नाहीत पण चौथा मात्र वडिलांच्या इच्छेनुसार वकील झाला. दुसरा भाऊ प्रथेनुसार वागला नाही. त्याला प्रथेनुसार वाह्यात म्हणता यावे. पर्यायी प्रथेनुसार तो अनेक व्यसने मोठ्या प्रमाणावर करू लागला. तंबाखूचे पान सतत चघळणे, दारू पिणे याबरोबरच त्याला वेश्यागमनाचा छंद जडला. माड्या चढण्यापेक्षा एखाद्या लॉजवर मुली बोलावणे त्याला अधिक पसंत होते. पण एकाच घरात राहात असल्याने व घरातील इतर प्रथा पाळणारे असल्याने घरातील वातावरण त्याच्यामुळे तणावपूर्ण होऊ लागले. त्यात तो गुलछबू होता. गळ्यात सोन्याच्या व फुलांच्या माळा, मनगटावर सोन्याचे ब्रेसलेट व सुगंधी फुलांचे गजरे, कपाळावर ठसठशीत उभे कुंकू, कानात अत्तराचे फाये व सोन्याच्या रिंगा, स्वच्छ पांढरा झब्बा-लेंगा, झब्ब्याला सोन्याची बटणे व ती साखळीने जोडलेली. कधीकधी खांद्यावर शाल.

वस्तुतः पैसा असल्याने स्वतःसाठी स्वतंत्र फ्लॅट घेणे दुसऱ्या भावाला शक्य होते. पण त्याच्या बायकोला एकत्र कुटुंबात सुरक्षित वाटत असे. या व्यसनी माणसाबरोबर फक्त आपण राहाणे तिला मान्य नव्हते. दुसरा घटक म्हणजे, वडिलांच्या निधनानंतर अगदी वेगळा फ्लॅट घेऊनही या भावाला वडिलोपार्जित प्रॉपर्टीतील बराच मोठा हिस्सा रोख हवा होता. थोरला भाऊ त्याचा वाटा द्यायला तयार नव्हता. शेवटी तर हा सुधारणार नाही याची खात्री पटून त्याने याला घराबाहेर काढण्याचा निर्णय घेतला. तो प्रकार जरा अवघड होता. पण कुटुंबप्रमुख म्हणून याने ठरवले की भावाला वेडा व निराधार जाहीर करायचा. मग वेड्यांच्या सरकारी हॉस्पिटलमध्ये दाखल करायचा. त्यानुसार त्याने डॉक्टर, वकील यांच्याकडून कागदपत्रे करून घेतली. थोडा पैसा त्यासाठी खर्च केला पण त्याला कोर्टात हजार केले. त्याला कायदेशीरीत्या वेडा ठरवून वेड्यांच्या हॉस्पिटलमध्ये कायमचा फुकट दाखलही केला.

दरम्यान त्यांचे पारंपरिक अर्धे घर रस्तारुंदीत गेले. त्यामुळे भाऊ विभक्त झाले.

तिसऱ्या भावाने एक वर्कशॉप काढले, तर चौथ्याला वकिली काही जमेना. म्हणून त्याने एक मंगल कार्यालय सुरू केले. हा सदोदित पैसा देणारा व्यवसाय. लोक लग्न करणार, ते प्रथेनुसार ऐपतीच्या कार्यालयात ऐपतीनुसार करणार.

यथावकाश त्याने घरगुती इलेक्ट्रिक दुरुस्तीपासून शेतकऱ्यांचे पाण्याचे पंप दुरुस्त करणे हा अधिक पैसा देणारा धंदा शोधला. आधीच्या घरातच तळमजल्यावर रस्त्याला लागून त्याचे दुकान होते. रस्तारुंदीत ते गेल्यावर तो जेथे पंप बिघडला असेल, तेथे जाऊन ते दुरुस्त करू लागला.

यथावकाश चारही मुलींची व मुलाचे लग्न होऊन त्यांना यथावकाश अपत्यप्राप्तीही झाली.

काळाची दिशा लक्षात घेऊन व्यवहारचातुर्याने तो पैसा मिळवत असे. पुण्यातील वाडे जाऊन ओनरशिप फ्लॅट्सच्या इमारतींचा जमाना येत आहे हे त्याने ओळखले व एक जुना वाडा विकत घेतला. या वाड्यात स्वयंपाकघर आणि एक खोली तळमजल्यावर होती. पहिल्या मजल्यावर काहीच नव्हते, तो मोडकळीला आला होता. तेथून फक्त वर जायला एक जिना होता. दुसऱ्या मजल्यावर बेडरूम आणि टॉयलेट होते.

चार वर्षे त्या विचित्र वाड्यात तो, त्याची बायको, मुलगा, सून आणि त्यांचे बाळ राहिले. त्याच्या मते वाड्यातील एक भाडेकरू नाठाळ होता. याने त्याला दमदाटी करून घालवले. मग एका बिल्डरचा प्रस्ताव आल्यावर आपल्यासाठी नव्या इमारतीत एक मोठा फ्लॅट घेऊन त्याने वाडा सोडला. मुलगा, सून व हे नवरा-बायको त्या फ्लॅटमध्ये रहायला गेले. असा त्यांचा संसार पुन्हा सुखाचा, ते अमृतात नहाले.

- तो एका शालेय शिक्षकाचा मुलगा. ते यथावकाश उप-मुख्याध्यापक झाले. आई गृहिणी, अल्पशिक्षित. घर पुण्यातल्या जुन्या पेठेतील जुन्या वाड्यात रस्त्याला लागून होते. दार उघडले की तीन पायऱ्या आणि रस्ता. आई वर्षानुवर्षे तिथेच रहाणाऱ्या एका मोलकरणीबरोबर दिवसभर बाहेरच्या पायरीवर गप्पा मारत असे. ती एखाद्या गोष्टीबाबत साशंक असली तर एक कोड्यात टाकणारे विधान करे - असे मला वाटते का काय कोणास ठाऊक! हा एकुलता एक मुलगा. त्यामुळे लाडात वाढला. दिसायला बरा, गोरा, कुरळ्या केसांचा. त्याचे मराठी चांगले होते, ही त्या काळातही अपवादात्मक गोष्ट. तसेच अक्षरही अत्यंत वळणदार होते. अधिकच अपवादात्मक. तो आर्ट्स कॉलेजला होता. आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धांत भाग घेत असे, नाटकातही काम करत असे. प्रथेप्रमाणे त्यामुळे मुली त्याच्यावर भाळत असत. त्यामुळे तोही खूश होता.

प्रथेप्रमाणे लग्नाच्या वयात लग्न करणे त्याला जरूरीचे वाटू लागले. प्रथेप्रमाणे व कायद्याने लग्न एकीशीच करणे मान्य होते, म्हणून त्या अर्धा डझन फॅन्सपैकी एकीशी त्याने लग्न केले. त्याला नोकरी नव्हती. तिला पदवी मिळाल्यामिळाल्या नोकरी लागली होती. आई-वडील आणि ती यांचा तो आवडता असल्याने लग्नाला कोणाचीच हरकत नव्हती, वडिलांनी त्यांच्या शाळेच्या मैदानातच लग्न लावून दिले. लग्नानंतर ते त्याच्या आई-वडिलांच्या घरी राहू लागले. राहाण्याची जागा म्हणजे वाड्यातल्या दोन लहान खोल्या. त्यात जरा आडोसा करून नवविवहितांसाठी प्रायव्हसी करण्यात आली. वाड्यात बरेच भाडेकरू पण कॉमन संडास दोनच. त्यातील एक मोडका म्हणून कायमचा बंद. म्हणजे सगळे भाडेकरू अत्यंत गलिच्छ एक संडासच वापरत. पाण्याच्या अभाव आणि अस्वच्छता ही संस्कृती असल्यामुळे कमालीची घाण व दुर्गंधी.

तशा घरात ती नवविवाहिता कुरकुर न करता राहिली.

त्याला काही काळाने पण चांगली नोकरी लागली. यथावकाश त्यांनी कमी भाड्याचा फ्लॅट शोधला. यथावकाश त्यांना अपत्यप्राप्तीही झाली. म्हणजे त्यांचा संसार हा सुखाचा, ते अमृतात नहाले.

यथावकाश त्याची आई गेली, वडील निवृत्त झाले.

काही काळात त्याला नोकरीत प्रॉब्लेम येऊ लागले. एकतर त्याची स्वतःची कार्यक्षमता कमी होती, त्यात तेथील अंतर्गत राजकारण. त्यामुळे नोकरी गेली. दुसरी मिळेना. घराची आवक निम्म्यावर आली. मग दोघांच्यात खटके उडू लागले. मुलांच्या संगोपनावरही एकमत होईना. लग्नाआधी त्याचे मराठी वाचन बरे होते. (ग. ल. ठोकळ, वि. वि. बोकील,चंद्रकांत काकोडकर असे 'लेखक'!) लग्नानंतर वाचन थांबले. बायकोचे इंग्रजी वाचन पहिल्यापासून चांगले होते. मग बौद्धिक तफावत वाढत गेली. त्याच्या आई-वडिलांच्यात ही तफावत उलट्या दिशेने होती. पण प्रथेनुसार ते लग्न शाबूत राहिले. मात्र पर्यायी प्रथेनुसार यांच्या प्रेमविवाहातील 'प्रेम' यथावकाश संपुष्टात आले होते.

त्यात त्याने दुसऱ्या एका मुलीशी प्रेमप्रकरण सुरू केले असे बायकोने प्रथेनुसार बाहेरून ऐकले. वस्तुतः त्याच्या वतीने प्रेम वगैरे नव्हतेच. या मुलीचे पोस्टात बरेच पैसे होते. बरेच म्हणजे काही हजारांत, लाखांत नव्हे. याचा डोळा त्यावर होता. कारण त्याची स्वतःची कमाई बंद होती, मग गोड बोलून, काहीतरी थातुरमातुर सबबी देऊन संधी मिळताच त्याने ते पैसे लाटले. म्हणजे, तिचे प्रेमही गेले आणि पैसेही गेले. प्रथेनुसार यामुळे ती खवळली. प्रथेनुसार तिने सूड घेण्याचा निश्चय केला व हा प्रकार त्याच्या बायकोच्या कानावर घातला.

नवरा दुसऱ्या बाईच्या नादी लागणे ही आपली प्रतारणा आहे, विश्वासघात आहे, पाप आहे, आपल्याला नकार आहे, आपल्यात काहीतरी उणीव आहे, याबद्दल आपण दुःखी होणे जरूरीचे आहे, इत्यादी मानण्याची प्रथा. त्या प्रथेच्या प्रतारणा, विश्वासघात या घटकांनुसार बायको प्रथेप्रमाणे चवताळली. त्यापुढे जाऊन याची एकूण बौद्धिक क्षमता कमी असली तरी शाळाशिक्षकाचा हा मुलगा फसवणुकीच्या या थराला जाईल याची तिला अपेक्षा नव्हती. या मुलीबरोबर त्याचे शरीरसंबंधही असणार

याचीही तिला खात्री होती. उगाच का ती याला पैसे देईल? (यात अशा व्यवहारातील पैशाची स्त्री-ते-पुरुष अशी प्रथेनुसार नसणारी, उलटी दिशा तिला दिसत होती, त्यामुळे तर ती मुलगी याच्यासाठी वखवखलेली असणार असा याच्या बायकोचा ग्रह झाला!) पैसे गेले म्हणून ही आरडाओरडा करते आहे! शरीरसंबंधांच्या संशयाने बायकोच्या संतापाचा कडेलोट झाला. प्रथेनुसार हे एकपत्नीव्रताचे उल्लंघन होते. त्यामुळे, म्हणजे, दोघींची व्यथा निराळी असली तरी याला धडा शिकवायचाच यावर त्यांचे एकमत झाले.

प्रथेनुसार प्रथम त्या पोलिसांत गेल्या. तिने स्वखुशीने पैसे दिले असतील असा मुद्दा काढून पोलिसांनी तक्रारीत दम नाही असे सांगितले. मग पैसे घेऊन (खोट्या असल्या तरी) बातम्या छापणाऱ्या एका वार्ताहराला त्यांनी गाठले. त्याला पैसे देऊन याचे नाव स्थानिक पेपरात या फसवणुकीच्या बातमीत छापून आणले. परिणामतः त्याची नोकरी गेली, लग्न मोडले आणि म्हाताऱ्या निवृत्त वडिलांना मनस्ताप मात्र झाला.

विशेष म्हणजे त्याची एक फॅन नंतर पंचवीस-तीस वर्षांनी त्याला ओळखणाऱ्या एकाला भेटली. तिने याच्याबरोबर कॉलेजातील नाटकात काम केले होते, हे त्याच्या लक्षात होते. त्याने याचा संदर्भ न देता तिला 'तुम्ही त्या कॉलेजच्या त्या नाटकात होतात का' असे विचारले. मग तो कोठे राहात होता हे कळल्यावर तिच्या पायातले त्राणच गेले आणि ती मटकन खाली बसली. कारण त्याची खोली याच्या शेजारची. 'चार वर्षे कॉलेजच्या काळात आमचा तो रस्ता रोजचा होता.'

पैशाचे प्रकरण पेपरला आल्यावर त्याचे वडील असेच एका ओळखीच्यांना भेटले आणि मुलगा या प्रकरणात पूर्ण निर्दोष आहे असे त्यांनी सांगितले. अशी मजा!

- त्याचे वडील एका इंजीनियरिंग कॉलेजमध्ये प्रोफेसर होते. आई बऱ्यापैकी प्रसिद्ध हिंदी लेखिका होती आणि पारंपरिक हिंदी लोकगीतांचा तिचा अभ्यास मोठा होता. त्यांना प्रथेनुसार यथावकाश दोन मुले झाली. दोन्ही मुलगे. प्रथेनुसार एक इंजीनियर झाला, प्रथेनुसार दुसरा डॉक्टर. इथपर्यंत त्यांचा संसार हा सुखाचा, ते अमृतात नहाले.

पहिल्या मुलाला शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवायलाही आवडत असत. त्यात नफे-तोटे होत असत, पण एक झिंग असे. पण त्याला अधिक लवकरच्या आणि निश्चित झिंगेचे दारूचे व्यसन लागले. इंजीनियरिंग किंवा शेअर्स यांच्यापेक्षा त्याला दारू पिण्यात जास्त रस निर्माण झाला. प्रथेनुसार आई-वडिलांना वाटले की त्याचे लग्न केल्यास तो प्रथेप्रमाणे सरळ मार्गावर येईल. त्यांनी एक मुलगी शोधून त्यांचे लग्न लावून दिले. त्यांना यथावकाश अपत्यप्राप्तीही झाली. पण बाळंतपणाला बायको माहेरी गेल्यावर तेथेच राहिली. याला ती परत यायलाच नको होती. आई-वडिलांना प्रथेनुसार हा मोठाच धक्का होता. मुलगा नशेत आणि आपण एका मुलीच्या आयुष्याचे वाटोळे केले ही अपराधी भावना. २५ वर्षे हा मुलगा ना बायकोला भेटला ना मुलीला. यथावकाश यकृताच्या विकाराने तो मरण पावला.

दुसरा मुलगा डॉक्टर झाल्यावर प्रथेनुसार इंग्लंडला गेला. त्याचे करिअर तेथे चांगले सुरू झाले. त्याने एका भारतीय डॉक्टर मुलीशी लग्न करून तिलाही इंग्लंडला आणले. यथावकाश त्यांना अपत्यप्राप्तीही झाली. अलीकडे रूढ झालेल्या प्रथेनुसार हे सगळे आपले एकट्याचे कर्तृत्व आहे असा या मुलाचा पक्का समज होता. बहुतेक सुशिक्षित, संपन्न भारतीय या प्रथेनुसार वागतात. आपला जन्म व शिक्षण शहरात झाले, निवासस्थान चांगले होते, जन्म वरच्या जातीत झाला, त्यामुळे जातीव्यवस्था आपल्याला अनुकूल होती, घरात आई-वडील सुशिक्षित होते, शिक्षण हे मूल्य होते इत्यादी घटक आपल्या यशामागे आहेत याची जाणीव अशा लोकांत नसते.

बेर्टोल्ट ब्रेष्ट या जर्मन लेखकाने सिकंदरच्या जगज्जेतेपणावर एक प्रश्न विचारला होता - सिकंदर या चढायांवर एकटा गेला होता का?

वस्तुतः कोणीही सुमार बुद्धीचा माणूस संधी मिळाल्यास असा उच्चशिक्षित होऊ शकतो. हे तर आरक्षणाचे तत्त्व आहे आणि ते बहुधा बरोबर सिद्ध झालेले आहे, पण वाढत्या लौकिक यशाबरोबर हे लोक अधिकाधिक आत्मकेंद्रित होऊ लागतात आणि आपल्या विचारसरणीत काही चूक आहे असे त्यांना वाटत नाही. त्यांच्या यशाने

दिपून जाणारे गणंगही त्यांना यथावकाश भेटतात.

अर्थात् बृहत्समाजाबद्दल ते उदासीन असतात व म्हणून अनभिज्ञही. उदाहरणार्थ, ब्राझीलमधील निसर्गकोप, अर्जेंटिनाची चमत्कारिक आर्थिक स्थिती, सुदान-दारफ्यूरमधील वर्षानुवर्षे चालू हत्याकांड या सामूहिक मानवी वेदनेची त्यांना जाणीवही नसते. किमान आपण ज्या जगात राहातो, त्या जगातील घडामोडींची माहिती तरी असावी? विशेषतः इंटरनेटच्या युगात जग जवळ आल्याचे म्हटले जाते. पण नव्या प्रथेनुसार ही मंडळी इंटरनेटवर फक्त आपल्या कामधंद्यासाठी आवश्यक एवढाच भाग उचलतात आणि स्वतःच्या कोषातच जास्त जास्त गुंतत जाताना दिसतात. ही मानसिकता ब्रिटनसारख्या विकसित देशात अल्पशिक्षित, कमी मिळकत असणाऱ्या वर्गात पूर्वापारपासून आहे. त्यांचा मानसिक भूगोल काही मैलांपालीकडे जात नाही. दर सुट्टीला स्पेनला जातील पण स्कॉटलंड या स्वतःच्या देशाच्या भागात काय चालले आहे, ते त्यांना माहिती नसते. कारण उपजीविकेसाठी त्याची जरूरी नसते आणि उत्सुकताही नसते. तोच कित्ता गिरवणारे हे भारतीय वंशज.

उदाहरणार्थ या डॉक्टरने इंग्लंडमध्ये घर घेतले. त्या घराचे कौतुक तो अनंतकाल करू शके. त्यांची गाडी अद्ययावत टेस्ला होती. तिचे कौतुक. अमुक एक उच्चपदाधिकारी माझा कसा चांगला मित्र आहे, इत्यादी. या प्रथेनुसार त्याचा जगाकडे पाहाण्याचा दृष्टिकोनही एकरेषीय होता. त्या दृष्टिकोनाबाहेरचे जग म्हणजे ज्यांचा खुलासा या दृष्टिकोनाने होऊ शकत नाही, त्या प्रसंगांची नोंद नाकारणे. त्यात डॉक्टर असल्याने सगळ्या व्याधींवर निश्चित औषध असते हा थक्क करणारा विश्वास त्या दृष्टिकोनाचा भाग. विज्ञान आणि तंत्रज्ञान अपराजेय आहेत आणि ते श्रेयस्कर आहे ही श्रद्धा एखाद्या भोंदू बुवाच्या भगतासारखीच. फरक असा की चूक ठरवले जाणे ही विज्ञानाची प्राथमिक कसोटी असते.

हा आत्मकेंद्रिततेचा कोष इतका आक्रसलेला की आपण सरकारला नियमित द्यायचा तेवढा कर देतो, त्यापलीकडे या जगात काही का होईना या समजुतीत तो राहात असे. सरकार, समाज यांनाही ही भूमिका मान्य असते, तीही प्रथाच. परत सिकंदराकडे वळता, 'आता जगात जिंकायला प्रदेश उरला नाही' म्हणून तो हताश झाल्याचे सांगितले जाते. त्याच उच्च अवस्थेत हा डॉक्टर गेला. आणि निवृत्तीनंतर तो व त्याची बायको जगभर, म्हणजे, देशोदेशीच्या ठरावीक लोकमान्य स्थळांना प्रथेनुसार भेटी देऊ लागले व मजा आली असे जाहीर करू लागले.

प्रथेनुसार त्याची बायको तो म्हणेल ती पूर्व दिशा मानत असे. असा त्यांचा संसार हा सुखाचा ते अमृतात नहाले.

**– चन्द्रशेखर पुरन्दरे**
purandarearts,com
artnondeco@yahoo.co.uk

मुक्त शब्दचे मित्र व्हा!
कारण आजच्या बिकट परिस्थितीत
ते तुमच्याबरोबर राहू इच्छिते.